दिनांक : १७.०२.२०२६.

नि.फौ.ख.क्र. १०९/२०२३
सरकार ..वि.. ऋषीकेश मुळे + ३
निशाणी क्रमांक २७

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक २ ची जबानी –**

**मी शपथेवर सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| **नाव** | :– | **शुभम सुधिरराव बोके** (जखमी साक्षीदार) |
| **वय** | :– | ३२ वर्षे, |
| **व्यवसाय** | :– | शेती, |
| **राहणार** | :– | मुर्तीजापुर तरोडा, ता. तिवसा, जि. अमरावती. |

........................................................................................................

**सरकार तर्फे सहायक सरकारी विधीज्ञ कु. एल.टी. गेडाम यांचे मार्फत शपथेवर सुरु** :-

मी आरोपींना ओळखतो. मि फिर्यादीला ओळखतो. मला घटना कधी घडली हे मला आठवत नाही. घटनेच्या वेळी मला मारहाण झाली नव्हती. सुरज पडोळे यांनी कोणताही रिपोर्ट दिला नव्हता.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे विद्वान सहायक सरकारी विधीज्ञ यांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली असता भारतीय पुरावा कायदयाच्या कलम १५४ नुसार परवानगी देण्यात येत आहे.**

**सरतपास – संपला.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२.०२.२०२३ रोजी रात्री ९:०० वाजता मी व सुरज पडोळे कुणाल कडु यांच्या विट भट्टीजवळ भांडणाच्या समजोत्यासाठी जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे सर्व आरोपी हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे गेल्यावर सर्व आरोपींनी आम्हांला मारहाण केली व आरोपी क्रमांक २ कुणाल कडु याने माझ्या डोक्यावर लोखंडी रॉडने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या डोक्याला मारहाण झाल्यामुळे रक्त निघाल्यामुळे जखम झाली होती म्हणुन फिर्यादी हे मला कुऱ्हा येथील रुग्णालयात घेऊन गेले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझे दरम्यान

न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्यामुळे मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास –संपला.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए. पी. लांडे यांचे मार्फत :- नाकारला.**
**उलटतपास – संपला.**
**फेरतपास काही नाही.**

---

**साक्षीदाराची सही/निशानी अंगठा**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.** **समक्ष**

स्वा/-
**(रोहीणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
तिवसा, ता. तिवसा, जि. अमरावती

स्वा/-
**(रोहीणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
तिवसा, ता. तिवसा, जि. अमरावती